280

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक ०१/०३/२०२४

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग,परिपत्रक क्र.एसआरव्ही-२०२२/प्र.क्र.४८/ कार्यासन १२, दिनांक २९ फेब्रुवारी, २०२४.

**विषय** :- आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना देय असलेल्या एकस्तर पदोन्नती वेतनश्रेणीच्या लाभाबाबत स्पष्टीकरणात्मक सूचना.

******

परिपत्रक -

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र. एसआरव्ही-२०२२/प्र.क्र.४८/कार्यासन १२, दिनांक २९ फेब्रुवारी, २०२४. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४०२२९१११८५२८५०७ असा आहे.

२. तरी, सदर शासन परिपत्रकानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई (सस्नेह).
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, / दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह).
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था / प्रशिक्षण व खास पथके /आस्थापना /प्रशासन नियोजन व समन्वय /विशेष कृती /रा.रा.पो.बल /वाहतूक / फोर्स वन /आर्थिक गुन्हे / महिला व बाल अत्याचार प्रतिबंध विभाग / नागरी हक्क संरक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग , महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक



Scanned with CamScanner

विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था/आस्थापना/प्रशासन/सायबर सुरक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, मुंबई/मोटार परिवहन विभाग, पुणे/
नक्षल विरोधी अभियान,नागपूर.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे
उप संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.
सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्गासह )
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्रे.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु./ प्रशासन / नि. व स./ धोरण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे वरिष्ठ उपसहायक/ उपसहायक
सर्व कार्यासन अधिकारी, का.क्र.०१ ते ४४

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन अधिसूचनेची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके " आस्थापना " या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना देय असलेल्या एकस्तर पदोन्नती वेतनश्रेणीच्या लाभाबाबत स्पष्टीकरणात्मक सूचना......**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः एसआरव्ही २०२२/प्र.क्र.४८/कार्यासन १२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २९ फेब्रुवारी, २०२४

**वाचा** :- सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांकः टिआरएफ -२०००/प्र.क्र.३/१२, दि.०६.०८.२००२

**प्रस्तावना** :- आदिवासी भागात कार्यरत असलेल्या काही कर्मचाऱ्यांनी त्यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय झाल्यानंतर, त्यांना दिलेले एकस्तर पदोन्नतीचे लाभ काढून घेण्यात आल्याच्या विरोधात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. ८८२०/२०२१ दाखल केली होती. सदर रिट याचिकेच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने दि.२१.१२.२०२१ रोजी न्यायनिर्णय दिला असून त्याद्वारे सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि.०६.०८.२००२ मधील ३(७) येथील तरतुदीचा योग्य अन्वयार्थ स्पष्ट करण्याचे निर्देश दिले आहेत.

तद्नंतर एकस्तर पदोन्नतीचे लाभ काढून न घेण्यासाठी मा.उच्च न्यायालयात विविध रिट याचिका (रिट याचिका क्र. ८८२१/२०२१, ८८२२/२०२१, ८८२३/२०२१, ८८२४/२०२१, ८८२५/२०२१ तसेच रिट याचिका क्र. ३१५८/२०२१, ३२८४/२०२१, ४११५/२०२१ आणि ४२१३/२०२१) दाखल झाल्यानंतर या सर्व याचिकांच्या प्रकरणी देखील मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. ८८२०/२०२१ च्या अनुषंगाने दिलेल्या आदेशाप्रमाणेच कार्यवाही करण्याबाबत निर्देशित केले आहे.

मा.उच्च न्यायालयाच्या उपरोक्त निर्देशांनुसार सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०६.०८.२००२ च्या शासन निर्णयामधील ३(७) येथील तरतुदीचा योग्य अन्वयार्थ स्पष्ट करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक** :- राज्यातील दुर्गम व मागासलेल्या आदिवासी भागांचा तसेच नक्षलग्रस्त संवेदनशील भागांचा जलद गतीने विकास होण्याच्या दृष्टीने या बिकट क्षेत्रात शासकीय योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी तेथे कार्यरत असणाऱ्या शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांना प्रोत्साहनात्मक सवलती देय करण्याबाबत संदर्भाधीन शासन निर्णय दि.०६.०८.२००२ अन्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयाद्वारे एकस्तर पदोन्नती देण्याबाबतची नवीन सवलतीबाबतची तरतूद ३(७) खालीलप्रमाणे आहे :-

"**सर्व पदांसाठी एकस्तर पदोन्नती :-**

आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रात काम करण्यासाठी प्रोत्साहन म्हणून गट अ ते गट ड मधील सर्व पदधारकांना संबंधित कर्मचारी/ अधिकारी त्या क्षेत्रात कार्यरत असेपर्यंतच्या काळात त्यांनी धारण केलेल्या मूळ पदाच्या नजीकची वरिष्ठ/ पदोन्नतीची वेतनश्रेणी व त्या अनुषंगाने वेतननिश्चितीचा लाभ देण्यात यावा. ज्या कर्मचारी अधिकाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे, त्यांना आणखी वरिष्ठ पदाच्या वेतनश्रेणीचा लाभ अनुज्ञेय नसेल. ही एकस्तर पदोन्नतीची योजना दि.०१.०२.२००२ पासून अंमलात येईल आणि ती संबंधित कर्मचारी/ अधिकारी आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत असेपर्यंतच अनुज्ञेय राहील. त्या क्षेत्रातून कर्मचारी/ अधिकारी बिगर आदिवासी क्षेत्रात परत आल्यावर तो त्याच्या मूळ संवर्गातील वेतनश्रेणीत पूर्वीच्या वेतनाच्या अनुषंगाने वेतन घेईल. "

०२. दरम्यान आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात, एकस्तर पदोन्नती योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना असे निदर्शनास आले आहे की, आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना प्रथम एकस्तर पदोन्नती दिल्यानंतर, जेव्हा असे कर्मचारी सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळण्यास पात्र ठरतात, तेव्हा अशा कर्मचाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करुन, यापूर्वी देण्यात आलेला एकस्तर पदोन्नती योजनेचा लाभ काढून घेण्यात येतो. तसेच एकस्तर पदोन्नती योजनेंतर्गत देण्यात आलेली वेतनश्रेणी आणि आश्वासित प्रगती योजनेंतर्गत मिळणारी वेतनश्रेणी यामधील फरकाची रक्कम अशा कर्मचाऱ्यांकडून वसूल करण्यात येते.

०३. वरील परि.०२ मध्ये नमूद बाबीच्या अनुषंगाने दाखल झालेल्या रिट याचिकांच्या अनुषंगाने **मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०६.०८.२००२ च्या शासन निर्णयामधील ३(७) येथील तरतुदीचा अन्वयार्थ खालीलप्रमाणे स्पष्ट करण्यात येत आहे :-**

सदर तरतुदीत २ शासकीय योजनांचा उल्लेख केलेला आहे. त्या २ योजनांची मुलभूत माहिती पुढीलप्रमाणे आहे.

| योजनेचे नाव | योजनेचे प्रयोजन | योजनेचे कार्यक्षेत्र | योजनेंतर्गत मिळणारा लाभ |
|---|---|---|---|
| सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना | पदोन्नतीतील कुंठितता घालवणे | संपूर्ण महाराष्ट्र राज्य | पदोन्नतीच्या वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी देणे |
| एकस्तर पदोन्नती योजना | आदिवासी व नक्षलग्रस्त या बिकट क्षेत्रात काम करण्यासाठी प्रोत्साहित करणे | केवळ आदिवासी क्षेत्र व नक्षलग्रस्त क्षेत्र | पदोन्नतीच्या वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी देणे |
| **टीप :-** आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत शासकीय कर्मचाऱ्यास दोन्ही योजना लागू आहेत. मात्र बिगर आदिवासी व बिगर नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत शासकीय कर्मचाऱ्यास केवळ सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू आहे. | | | |

उपरोक्त तक्त्याद्वारे ही बाब स्पष्ट होते की, या दोन योजनेचे प्रयोजन तसेच कार्यक्षेत्र जरी भिन्न भिन्न असले तरी, दोन्हीही योजनेंतर्गत मिळणारा आर्थिक लाभ हा समान आहे. यास्तव एकाच वेळी दुहेरी लाभ देणे अभिप्रेत नाही.

त्यामुळे आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत असणा-या कर्मचा-यांस या दोन्ही योजनांपैकी प्रथम ज्या योजनेंतर्गत तो लाभ मिळण्यास पात्र ठरेल, त्यानुसार पदोन्नतीच्या वरिष्ठ पदाच्या वेतनश्रेणीचा लाभ देण्यात यावा. तद्नंतर भविष्यात सदर कर्मचारी ज्या वेळी दुस-या योजनेंतर्गत लाभ मिळण्यास पात्र ठरेल, त्यावेळेस तो आधीपासून पदोन्नतीच्या वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी घेत असल्याने त्यास दुसऱ्या योजनेंतर्गत वेगळयाने तोच लाभ देय करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. कारण दोन्हीही योजनेंतर्गत मिळणारा आर्थिक लाभ हा समान आहे. यास्तव एका योजनेंतर्गत लाभ मिळाल्यानंतर दुसऱ्या योजनेंतर्गत वेगळयाने लाभ देणे अभिप्रेत नाही.

**उपरोक्त स्पष्टीकरणाचा सारांश असा आहे की, आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत असणा-या कर्मचाऱ्यांस एका योजनेंतर्गत लाभ मिळाल्यानंतर दुसरी योजना लागू करू नये. म्हणजेच, एका योजनेंतर्गत लाभ दिल्यानंतर दुसऱ्या योजनेंतर्गत लाभ देय ठरेल, त्यावेळी पहिल्या योजनेंतर्गत दिलेला लाभ वसूल करून दुसऱ्या योजनेचा लाभ लागू करणे अभिप्रेत नाही. तसेच, पहिल्या योजनेचा लाभ चालू असताना दुसऱ्या योजनेंतर्गत त्यास आणखी वरिष्ठ पदाच्या वेतनश्रेणीचा लाभ लागू करणे देखील अभिप्रेत नाही.**

तसेच ३ (७) मध्ये "*मूळ पदाच्या **<u>नजीकची वरिष्ठ/ पदोन्नतीची वेतनश्रेणी</u>** व त्या अनुषंगाने वेतननिश्चितीचा लाभ देण्यात यावा."* असे विहित करण्यात आले आहे. तथापि त्यामुळे नेमकी कोणती वेतनश्रेणी द्यावी याबाबत स्पष्टता नसल्याने त्या अनुषंगाने स्पष्ट करण्यात येते की, जर सेवाप्रवेश नियमानुसार धारण करत असलेल्या पदावरून पदोन्नती देण्यासाठीचे वरिष्ठ पद अस्तित्वात असले तर, अशा प्रकरणी पदोन्नतीच्या पदाच्या वेतनश्रेणीचा लाभ देणे आवश्यक आहे. तथापि, जर सेवाप्रवेश नियमानुसार धारण करत असलेल्या पदावरून पदोन्नती देण्यासाठीचे वरिष्ठ पद अस्तित्वात नसल्याने पदोन्नतीची संधी उपलब्ध होत नसल्यास, वेतन आयोगाच्या पुस्तिकेत धारण केलेल्या मूळ पदाच्या वेतनश्रेणीच्या नजीकची जी वेतनश्रेणी नमूद करण्यात आली आहे, त्या वेतनश्रेणीचे लाभ देणे आवश्यक आहे.

०४. उपरोक्त अन्वयार्थाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे घटनानिहाय कार्यवाही करण्यात यावी. अशी कार्यवाही करताना, सोबतच्या परिशिष्टातील उदाहरण सुलभ संदर्भासाठी विचारात घ्यावे.

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>घटना</th><th>दि. ६.८.२००२ च्या शासन निर्णयानुसार अभिप्रेत असलेली कार्यवाही</th></tr>
<tr><td>१</td><td>मूळ नियुक्ती आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात झाली असून त्या क्षेत्राबाहेर बदलीपात्र नाही.</td><td>मूळ नियुक्ती आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात झाल्यानंतर, अशा शासकीय कर्मचाऱ्यांस नियुक्तीनंतर लगेच एकस्तर पदोन्नती योजना लागू होते व त्यानुसार तो ज्या पदावर कार्यरत आहे, त्याच्या वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी देय ठरते.<br>तद्नंतर सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही खालीलप्रमाणे असेल
<table>
<tr><th></th><th>पदोन्नतीची माहिती</th><th>करावयाची कार्यवाही</th></tr>
<tr><td>पहिला लाभ</td><td>नियुक्तीपासून १० वर्षाच्या सेवा कालावधीत प्रत्यक्ष पदोन्नती न मिळाल्यास</td><td>नियुक्तीपासून १० वर्षे पदोन्नती पासून वंचित राहिल्यामुळे सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेस पात्र ठरतो. तथापि, तो एकस्तर योजनेंतर्गत वरिष्ठ पदाची वेतनश्रेणीत वेतन घेत असल्याने त्याला सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ देय ठरणार नाही.</td></tr>
<tr><td></td><td>नियुक्तीपासून १० वर्ष सेवा कालावधीत प्रत्यक्ष पदोन्नती मिळाल्यास</td><td>नियुक्तीपासून १० वर्ष पदोन्नतीपासून वंचित न राहिल्यामुळे सेवांतर्गत आश्वासित योजनेचा पहिला लाभास पात्र ठरत नाही.</td></tr>
<tr><td>दुसरा लाभ</td><td>१० वर्षाच्या सेवेनंतर पुढील १० वर्षाच्या कालावधीत प्रत्यक्ष पदोन्नती न झाल्यास (म्हणजेच एकूण २०</td><td>२० वर्षाच्या एकूण सेवेनंतर त्यास सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ देय होईल.<br>सबब, एकस्तर प्रगती योजनेंतर्गत नियुक्तीच्या मूळ</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | वर्ष सेवा कालावधीत एकही पदोन्नती न मिळता, तो मूळ नियुक्तीच्या पदावरच कार्यरत राहिल्यास) | पदाऐवजी पदोन्नतीच्या वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी घेतली असल्याने २० वर्षानंतर पदोन्नतीच्या पदाच्या आणखी वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ म्हणून लागू होईल. |
| | | | १० वर्षाच्या सेवेनंतर पुढील १० वर्षाच्या कालावधीत प्रत्यक्ष पदोन्नती झाल्यास, | ज्या पदावर प्रत्यक्ष पदोन्नती झाली त्याच्या वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी एकस्तर योजनेंतर्गत देय ठरणार असल्याने त्यास सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ देय ठरणार नाही. |
| | | तिसरा लाभ | २० वर्षाच्या सेवेनंतर पुढील १० वर्षाच्या कालावधीत त्याची प्रत्यक्षात पदोन्नती न झाल्यास (म्हणजेच ३० वर्ष कालावधीत त्यास एकही पदोन्नती न मिळता तो मूळ नियुक्तीच्या पदावरच कार्यरत राहिल्यास) | ३० वर्षाच्या एकूण सेवेनंतर त्यास सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा तिसरा लाभ देय होईल.<br>सबब, एकस्तर प्रगती योजनेंतर्गत नियुक्तीनंतर लगेच मूळ पदाऐवजी पदोन्नतीच्या वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी मिळालेली असल्याने आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ मिळणार नाही. २० वर्षानंतर आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ मिळेल. (म्हणजेच पदोन्नतीच्या पदाच्या आणखीन वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी लागू होईल) ३० वर्षानंतर आश्वासित प्रगती योजनेचा तिसरा लाभ मिळेल (म्हणजेच पदोन्नतीच्या पदाच्या दोन वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी लागू होईल) |
| | | | २० वर्षाच्या सेवेनंतर परंतु ३० वर्ष सेवा होण्यापूर्वी प्रत्यक्षात १ पदोन्नती झाल्यास, | ज्या पदावर प्रत्यक्ष पदोन्नती झाली त्या पदाच्या वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी एकस्तर योजनेंतर्गत देय ठरणार असल्याने त्यास आश्वासित प्रगती योजनेचा तिसरा लाभ देय होणार नाही.<br>सबब, एकस्तर पदोन्नती |

<table>
<tr>
<td></td>
<td></td>
<td></td>
<td></td>
<td>योजनेंतर्गत नियुक्तीनंतर लगेच मूळ पदाऐवजी पदोन्नतीच्या वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी मिळालेली असल्याने आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ मिळणार नाही. २० वर्षानंतर आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ मिळेल. (म्हणजेच पदोन्नतीच्या पदाच्या आणखीन वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी लागू होईल)<br>त्यानंतर पदोन्नती झाली तरी तो त्यापूर्वीच आश्वासित प्रगती योजनेच्या दुसऱ्या लाभांतर्गत प्रत्यक्ष पदोन्नती झालेल्या पदाच्या वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी घेत असल्याने त्यास एकस्तर पदोन्नती योजनेचा लाभ देय होणार नाही.<br>तद्नंतर ३० वर्षानंतर आश्वासित प्रगती योजनेचा तिसरा लाभ देय होईल.</td>
</tr>
<tr>
<td></td>
<td></td>
<td></td>
<td>३० वर्षे सेवा होण्यापूर्वी २ वेळा प्रत्यक्ष पदोन्नती मिळाल्यास</td>
<td>३० वर्षाच्या एकूण सेवेनंतर त्यास सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा तिसरा लाभ देय होणार नाही.</td>
</tr>
<tr>
<td>२</td>
<td>मूळ नियुक्ती आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात झाली असून तद्नंतर भविष्यात बिगर आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात बदली झाली आहे.</td>
<td colspan="3">मूळ नियुक्ती आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात झाल्यानंतर, अशा शासकीय कर्मचाऱ्यांस नियुक्तीनंतर लगेच एकस्तर पदोन्नती योजना लागू होते व त्यानुसार तो ज्या पदावर कार्यरत आहे, त्याच्या वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी देय ठरते.<br>तद्नंतर अशा शासकीय कर्मचाऱ्याची काही वर्षाच्या सेवेनंतर बिगर आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात बदली झाल्यास, खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.<br>१) त्याला देण्यात येत असलेला एकस्तर पदोन्नतीचा लाभ बंद करुन तो ज्या पदावर कार्यरत असेल त्याच पदाची वेतनश्रेणी अनुज्ञेय होईल. त्या पदाची वेतनश्रेणी अनुज्ञेय करत असताना, त्या पदावरील त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून काल्पनिक वेतननिश्चिती करुन त्यानुसार वेतन देय होईल.<br>२) त्याचप्रमाणे अशा कर्मचाऱ्यास बिगर आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू असल्याने त्याअनुषंगाने पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी</td>
</tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| | | सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेस पात्र ठरल्यानंतर बिगर आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात बदली झाल्यास | आदिवासी/नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेस पात्र ठरला तरी त्यास दुहेरी लाभ अनुज्ञेय नसल्याने सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देय होणार नाही.<br>तद्‌नंतर संबंधित कर्मचाऱ्याची बिगर आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात बदली झाल्यास, तो सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या लाभास पात्र ठरेल. अशा परिस्थितीत तो आदिवासी/नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत असताना ज्या दिनांकास सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेस पात्र ठरला असता, त्या दिनांकापासून सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या लाभाची काल्पनिक वेतननिश्चिती करुन तो ज्या दिनांकास बिगर आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात रुजू होईल त्या दिनांकापासून प्रत्यक्ष वेतन देय ठरेल. |
| | | सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेस पात्र ठरण्यापूर्वीच बिगर आदिवासी/ नक्षलग्रस्त भागात बदली झाल्यास | ज्या दिनांकास सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेसाठी पात्र होईल, त्या दिनांकापासून त्यास सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देय ठरेल. |
| ३ | मूळ नियुक्ती बिगर आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात झाली असून तदनंतर आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात बदली झाली असल्यास | मूळ नियुक्ती बिगर आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात झाली व तद्‌नंतर अशा शासकीय कर्मचाऱ्याची आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात बदली झाल्यास बदली नंतर संबंधित कर्मचारी एकस्तर पदोन्नती योजनेस पात्र ठरतो. अशा कर्मचाऱ्यास एकस्तर पदोन्नती योजना लागू करण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करावी - | |
| | | जर अशा कर्मचाऱ्यास आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात बदली होण्यापूर्वीच सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात आला असल्यास | आदिवासी/नक्षलग्रस्त क्षेत्रात बदली होण्यापूर्वीच सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत पदोन्नतीच्या वरिष्ठ पदाच्या वेतनश्रेणीचा लाभ घेतला |

<table>
<tr><td></td><td></td><td>
<table>
<tr><td></td><td>असल्याने, आदिवासी/नक्षलग्रस्त क्षेत्रात बदली झाल्यानंतर त्याला एकस्तर पदोन्नती योजना लागू करण्यात येऊ नये. कारण त्यास पदोन्नतीच्या वरिष्ठ पदाच्या वेतनश्रेणीचा दुहेरी लाभ अनुज्ञेय नाही.</td></tr>
<tr><td>जर अशा कर्मचाऱ्यास आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात बदली होण्यापूर्वी सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यास पात्र ठरला नसल्याने हा लाभ देण्यात आला नसल्यास</td><td>आदिवासी/नक्षलग्रस्त क्षेत्रात बदली झाल्यानंतर त्याला एकस्तर पदोन्नती योजनेंतर्गत पदोन्नतीच्या वरिष्ठ पदाच्या वेतनश्रेणीचा लाभ देय होईल.<br>(तद्नंतर आदिवासी/नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत असतानाच आश्वासित प्रगती योजनेस पात्र ठरल्यास सदर तक्त्यातील अ.क्र. १ नुसार कार्यवाही करावी.)</td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td>४</td><td>आदिवासी/नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत असताना शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाल्यास</td><td>वित्त विभागाच्या दि. २७.१०.२०१४ च्या अधिसूचनेनुसार मनासे (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मध्ये सुधारणा करण्यात आली असून त्यानुसार कोणताही प्रोत्साहनपर वित्तीय लाभ, शासनाच्या धोरणानुसार देण्यात आलेल्या एकस्तर पदोन्नतीमुळे वेतनातील फरकासह (सेवाअंतर्गत आश्वासित प्रगती योजना वगळता), वेतनाची परिगणना करण्यासाठी अनुज्ञेय असणार नाही.<br>सबब, वित्त विभागाच्या सदर अधिसूचनेनुसार आदिवासी /नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत असताना सेवानिवृत्त झाल्यास अशा अधिकारी/कर्मचाऱ्याची सेवानिवृत्ती वेतन निश्चित करताना एकस्तर प्रगती योजनेंतर्गत दिलेले वेतन विचारात न घेता ज्या पदावर कार्यरत आहे त्या पदाच्या वेतनानुसार निवृत्तीवेतन निश्चित करावे.</td></tr>
</table>

सदर शासन परिपत्रक वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ३९३/२३ दि.१०.१०.२०२३ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०२२९१११८५२८५०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

GEETA RAHUL KULKARNI

Digitally signed by GEETA RAHUL KULKARNI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=87e2e317e0d978442ac6b599d6a0abcf73fe717ee52994443a8509075101cc93, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=92D474843B842720200D1A10946D5FC9348B9450F867605A47D177207C9BD384, cn=GEETA RAHUL KULKARNI
Date: 2024.02.29 18:08:48 +05'30'

**( गीता रा. कुलकर्णी )**
**उप सचिव (सेवा), महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,

२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई
६. सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना),
त्यांनी हे आदेश त्यांच्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रीय कार्यालयाच्या निदर्शनास आणावे, ही विनंती
७. प्रबंधक, ( मूळ शाखा तसेच अपिल शाखा) उच्च न्यायालय, मुंबई
८. प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
९. सचिव, (विधानसभा व विधान परिषद)  महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय मुंबई,
१०. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई व नागपूर
११. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई व नागपूर
१२. ग्रंथपाल , महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, विधान भवन, मुंबई ४०० ०३२.
१३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१५. मुख्य लेखापरीक्षक (निवासी लेखे), कोंकण भवन, नवी मुंबई,
१६. निवडनस्ती.

## शासन निर्णय क्र. एसआरव्ही २०२२/प्र.क्र.४८/कार्यासन १२ दि. २९ फेब्रुवारी२०२४ सोबतचे परिशिष्ट

आदिवासी/नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत कर्मचाऱ्यांच्या बाबतीत एकस्तर पदोन्नती योजना आणि आश्वासित प्रगती योजना कशाप्रकारे लागू करण्यात यावी याबाबत शासन निर्णयात देण्यात आलेला अन्वयार्थ हा या परिशिष्टातील खालील उदाहरणाच्या आधारे संदर्भासह स्पष्ट करण्यात येत आहे.

प्रशासकीय अधिकारी गट-ब (वेतनश्रेणी एस-१२)

↑

अधीक्षक, गट-क (वेतनश्रेणी एस-१०)

↑

वरिष्ठ लिपिक, गट-क (वेतनश्रेणी एस-८)

↑

लिपिक, गट-क (वेतनश्रेणी एस-६)

उदाहरण :-

| अक्र | घटना | दिनांक ०६.०८.२००२ नुसार अभिप्रेत असलेली कार्यवाही |
|---|---|---|
| १ | मूळ नियुक्ती आदिवासी/ नक्षलग्रस्त भागात झाली असून त्या क्षेत्राबाहेर बदलीपात्र नाही | • **लिपिक पदावर रुजू झाल्यावर** - अ" या नावाच्या कर्मचाऱ्याची आदिवासी/नक्षलग्रस्त क्षेत्रात लिपिक या पदावर (एस-६ या वेतनश्रेणीत) मूळ नियुक्ती झाल्याबरोबर एकस्तर पदोन्नती योजना लागू होईल. यास्तव लिपिक (एस-६) पदावर रुजू झाल्यावर त्याचवेळी वरिष्ठ लिपिक पदाची वेतनश्रेणी (एस-८) देय होईल.<br>• **पदोन्नती शिवाय लिपिक या पदावर १० वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी कार्यरत ( सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना पहिला लाभ)** - सदर "अ" हा कर्मचारी सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या पहिल्या लाभास १० व्या वर्षी पात्र ठरेल. तथापि, तो नियुक्तीच्या दिनांकापासूनच वरिष्ठ लिपिकाची वेतनश्रेणी (एस-८) एकस्तर पदोन्नती योजनेंतर्गत घेत असल्याने त्यास सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या पहिला लाभ देय ठरणार नाही.<br>• **लिपिक या पदावर १० वर्ष सेवा होण्याआधी पदोन्नती मिळाल्यास ( सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना पहिला लाभ)** - सदर "अ" हा कर्मचारी लिपिक (एस-६) पदावर ७ वर्ष सेवेनंतर वरिष्ठ लिपिक (एस-८) या पदावर प्रत्यक्ष पदोन्नती मिळाल्यास, पदोन्नतीनंतर त्यास एकस्तर पदोन्नती योजनेंतर्गत अधीक्षक (एस-१०) या पदोन्नतीच्या वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी देय होईल. सबब, १० वर्ष सेवेपूर्वीच पदोन्नती मिळाल्याने तो १० व्या वर्षी सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या पहिल्या लाभास पात्र ठरणार नाही.<br>• **पदोन्नती शिवाय लिपिक या पदावर २० वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी कार्यरत ( सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दुसरा लाभ)** - जर "अ" या कर्मचाऱ्यास २० वर्षाच्या शासकीय सेवेनंतरही लिपिक या मूळ पदावरून एकही पदोन्नती मिळाली नाही, तर सदर कर्मचारी २० वर्ष जरी लिपिक पदावर कार्यरत असला तरीही त्यास सदर २० वर्ष एकस्तर पदोन्नती योजनेंतर्गत वरिष्ठ लिपिकाची (एस-८) वेतनश्रेणी देय होईल. |

| | | |
|---|---|---|
| | | २० वर्षानंतर सदर कर्मचारी सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या दुसऱ्या लाभास पात्र ठरल्यावर त्यास अधीक्षक पदाची वेतनश्रेणी (एस-१०) दुसऱ्या लाभांतर्गत देय होईल.<br>• **लिपिक या पदावर १० वर्ष सेवेनंतर परंतु २० वर्ष सेवा होण्यापूर्वी वरिष्ठ पदावर पदोन्नती झाल्यास (सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दुसरा लाभ)** – लिपिक या पदावर १२ वर्ष सेवा केल्यानंतर वरिष्ठ लिपिक या पदावर प्रत्यक्ष पदोन्नती मिळाल्यास सदर “अ” या कर्मचाऱ्यास वरिष्ठ लिपिक पदावरील पदोन्नतीच्या दिनांकापासून एकस्तर पदोन्नती योजनेंतर्गत अधीक्षक पदाची वेतनश्रेणी (एस-१०) लागू होणार आहे. त्यामुळे २० वर्ष शासकीय सेवेनंतर सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या दुसरा लाभास पात्र ठरला तरी तो अधीक्षक पदाची वेतनश्रेणी (एस-१०) एकस्तर पदोन्नती योजनेंतर्गत घेत असल्याने त्यास सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या दुसरा लाभ देय ठरणार नाही.<br>• **पदोन्नती शिवाय लिपिक या पदावर ३० वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी कार्यरत ( सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना तिसरा लाभ)** – जर “अ” या कर्मचाऱ्यास ३० वर्षाच्या शासकीय सेवेनंतरही लिपिक या मुळ पदावरून एकही पदोन्नती मिळाली नाही तर सदर कर्मचाऱ्यास नियुक्तीपासून २० वर्ष सेवेपर्यंत एकस्तर पदोन्नती योजनेंतर्गत वरिष्ठ लिपिकाची (एस-८) वेतनेश्रणी देय होईल. २० वर्षानंतर सदर कर्मचारी सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या दुसऱ्या लाभास पात्र ठरल्यावर त्यास अधीक्षक पदाची वेतनश्रेणी (एस-१०) दुसऱ्या लाभा अंतर्गत देय होईल. त्यानंतर ३० वर्ष सेवेनंतर तो तिसऱ्या लाभास पात्र ठरल्यावर त्यास प्रशासकीय अधिकारी गट-ब पदाची वेतनश्रेणी (एस-१२) तिसरा लाभांतर्गत देय होईल.<br>• **लिपिक या पदावर २० वर्ष सेवेनंतर परंतु ३० वर्ष सेवा होण्यापूर्वी वरिष्ठ पदावर प्रत्यक्षात एकच पदोन्नती झाल्यास (सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना तिसरा लाभ)** –<br>“अ” या कर्मचाऱ्यास नियुक्तीच्या दिनांकापासून एकस्तर पदोन्नती योजनेंतर्गत वरिष्ठ लिपिक पदाची वेतनश्रेणी (एस-८) लागू झाली आहे. त्यामुळे १० वर्षाच्या सेवेनंतर पदोन्नती न मिळाल्याने आश्वासित प्रगती योजनेच्या पहिल्या लाभास पात्र ठरला तरीही एकस्तर योजनेंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी घेत असल्याने पहिला लाभ देय होणार नाही.<br>त्यास २० वर्षात एकही पदोन्नती न मिळाल्यास सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या दुसऱ्या लाभास पात्र ठरल्यास दुसरा लाभ देय होईल व त्यानुसार त्यास अधीक्षक पदाची वेतनश्रेणी (एस-१०) लागू होईल.<br>तद्नंतर लिपिक या पदावर २४ वर्ष सेवा केल्यानंतर, वरिष्ठ लिपिक (एस-८) या पदावर प्रत्यक्ष पदोन्नती मिळाली, तर एकस्तर योजनेंतर्गत त्याच्या वरिष्ठ पदावरील (अधीक्षक, एस-१०) वेतनश्रेणी देय असली तरी सदर कर्मचारी २० वर्षे सेवेनंतरच अधीक्षक (एस-१०) पदाची वेतनश्रेणी घेत असल्याने, त्याला एकस्तर पदोन्नती योजनेचा लाभ देय |

| | | |
|---|---|---|
| | | ठरणार नाही.<br>तद्नंतर ३० वर्ष सेवेनंतर तो सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या तिसऱ्या लाभास पात्र ठरला तर तिसरा लाभ देय होईल. त्यानुसार त्यास प्रशासकीय अधिकारी गट-ब पदाची वेतनश्रेणी (एस-१२) तिसऱ्या लाभांतर्गत देय होईल.<br>• **<u>लिपिक या पदावर रुजू झाल्यानंतर ३० वर्ष सेवा होण्यापूर्वी दोन वेळा प्रत्यक्ष पदोन्नती झाल्यास (सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना तिसरा लाभ)</u>** - "अ" या कर्मचाऱ्यास नियुक्तीच्या दिनांकापासून एकस्तर पदोन्नती योजनेंतर्गत वरिष्ठ लिपिक पदाची वेतनश्रेणी (एस-८) लागू झाली आहे. त्यामुळे १० वर्षाच्या सेवेनंतर पदोन्नती न मिळाल्याने आश्वासित प्रगती योजनेच्या पहिल्या लाभास पात्र ठरला तरीही एकस्तर योजनेंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी घेत असल्याने पहिला लाभ देय होणार नाही.<br>तद्नंतर लिपिक या पदावर १२ वर्ष सेवा केल्यानंतर वरिष्ठ लिपिक या पदावर प्रत्यक्ष पदोन्नती मिळाल्यास, सदर कर्मचाऱ्यास एकस्तर पदोन्नती योजनेंतर्गत वरिष्ठ लिपिक पदावरील पदोन्नतीच्या दिनांकापासून अधीक्षक पदाची वेतनश्रेणी (एस-१०) लागू होणार आहे. त्यामुळे २० वर्ष शासकीय सेवेनंतर सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या दुसऱ्या लाभास पात्र ठरला तरी तो अधीक्षक पदाची वेतनश्रेणी (एस-१०) एकस्तर पदोन्नती योजनेंतर्गत घेत असल्याने त्यास सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ देय ठरणार नाही.<br>तद्नंतर वरिष्ठ लिपिक या पदावर १२ वर्ष सेवा केल्यानंतर (एकूण २४ वर्षे सेवेनंतर) अधीक्षक या पदावर प्रत्यक्ष पदोन्नती मिळाल्यास, एकस्तर पदोन्नती योजनेंतर्गत अधीक्षक पदावरील पदोन्नतीच्या दिनांकापासून वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी पदाची वेतनश्रेणी (एस-१२) लागू होणार आहे. त्यामुळे ३० वर्ष शासकीय सेवेनंतर सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या तिसऱ्या लाभास पात्र ठरला तरी तो वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी पदाची वेतनश्रेणी (एस-१२) एकस्तर पदोन्नती योजनेंतर्गत घेत असल्याने, सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा तिसरा लाभ देय ठरणार नाही. |
| २ | मूळ नियुक्ती आदिवासी/ नक्षलग्रस्त भागात झाली असून तद्नंतर भविष्यात बिगर आदिवासी/ नक्षलग्रस्त भागात बदली झाली आहे. | १. **<u>सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेस पात्र ठरल्यानंतर आदिवासी/ नक्षलग्रस्त भागातून बिगर आदिवासी/ नक्षलग्रस्त भागात बदली झाल्यास -</u>**<br>• माहे मे २००७ मध्ये "अ" नावाच्या कर्मचाऱ्याची लिपिक (एस-६) या पदावर गडचिरोली या नक्षलग्रस्त क्षेत्रात प्रथम नियुक्ती झाली. त्यामुळे त्यास नियुक्तीपासून म्हणजेच माहे मे २००७ पासून एकस्तर पदोन्नती योजनेंतर्गत वरिष्ठ लिपिक (एस-८) पदाची वेतनश्रेणी लागू झाली आहे.<br>• तद्नंतर लिपिक या पदावरुन १० वर्षात वरिष्ठ लिपिक या पदावर पदोन्नती न मिळाल्याने, सन २०१७ मध्ये तो सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेस पात्र ठरला तरी तो वरिष्ठ लिपिकाची (एस-८) |

| | | |
|---|---|---|
| | | वेतनश्रेणी एकस्तर पदोन्नती योजनेंतर्गत सन २००७ पासून घेत असल्याने त्यास सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या पहिला लाभ देय ठरणार नाही.<br>• त्यानंतर माहे जून २०१९ साली त्याची गडचिरोली या नक्षलग्रस्त क्षेत्रातून रत्नागिरी या बिगर आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात बदली झाली. **त्यामुळे त्याला एकस्तर पदोन्नती योजनेचा लाभ बंद होईल आणि सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ माहे मे २०१७ पासून देय होईल**. त्यानुसार मे २०१७ मध्ये आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देय झाल्यापासून ते माहे जून २०१९ मध्ये रत्नागिरी जिल्हयात ज्या दिनांकास हजर होईल, त्या दिनांकापर्यंतच्या कालावधीसाठी आश्वासित प्रगती योजनेंतर्गत काल्पनिक वेतननिश्चिती करुन त्यानुसार पुढील वेतनाचा प्रत्यक्ष लाभ देण्यात यावा. मात्र सदर कार्यवाही करत असताना कोणतीही वसूली करणे अभिप्रेत नाही.<br><br>२. **<u>सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेस पात्र ठरल्यापूर्वीच आदिवासी/ नक्षलग्रस्त भागातून बिगर आदिवासी/ नक्षलग्रस्त भागात बदली झाल्यास</u>** -<br>• माहे मे २००७ मध्ये “अ” नावाच्या कर्मचाऱ्याची लिपिक (एस-६) या पदावर गडचिरोली या नक्षलग्रस्त क्षेत्रात प्रथम नियुक्ती झाली. त्यामुळे त्यास नियुक्तीपासून म्हणजेच माहे मे २००७ पासून एकस्तर पदोन्नती योजने अंतर्गत वरिष्ठ लिपिक (एस-८) पदाची वेतनश्रेणी देण्यात येईल.<br>• त्यानंतर माहे जून २०१४ मध्ये त्याची लिपिक या पदावरुन गडचिरोली या नक्षलग्रस्त क्षेत्रातून रत्नागिरी या बिगर आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात बदली झाल्यास त्याला एकस्तर पदोन्नती योजनेचा लाभ बंद होऊन वरिष्ठ लिपिक पदाची वेतनश्रेणी देणे बंद होईल. तथापि लिपिक या पदाची वेतनश्रेणी अनुज्ञेय करताना, तो लिपिक या पदावर माहे मे २००७ पासून कार्यरत असल्याने माहे मे २००७ पासून ते माहे जून २०१४ मध्ये रत्नागिरी जिल्हयात बदलीच्या ठिकाणी ज्या दिनांकास रुजू झाला त्या दिनांकापर्यंत लिपिक या पदाची काल्पनिक वेतननिश्चिती करुन त्यानुसार लिपिक या पदाचे वेतन देय होईल. मात्र सदर कार्यवाही करत असताना कोणतीही वसूली करणे अभिप्रेत नाही.<br>• तद्नंतर बिगर आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रातच कार्यरत असताना माहे मे २०१७ मध्ये तो सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेस पात्र ठरल्यास त्याला त्या दिनांकापासून वरिष्ठ लिपिक (एस-८) या पदाची वेतनश्रेणी लागू होईल. |

-x-x-x-x-x-x-